**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

# परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, १३ सप्टेंबर, २०१७ नुसार पात्र महाविद्यालयांकडुन शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरु करण्याकरीता पात्र महाविद्यालयांकडुन दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) मधील तरतुद व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, १३ सप्टेंबर, २०१७ यातील अटी व शर्ती यांची पुर्तता करणा-या पात्र महाविद्यालयांनीच प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करावेत.

१) विद्यापीठाच्या http://www.bamu.ac.in/ या संकेतस्थळावर Online Affiliation या लिंकवर विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९(६) मधील तरतुदीनूसार नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठीचे विद्यमान महाविद्यालयांचे किंवा परिसंस्थांचे नॅक / एनबीए मानांकनानुसार मुल्यांकन किंवा पुनर्रमुल्यांकन केलेले असणे आवश्यक आहे.
३) शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित केल्यानुसार विस्तारीकरणाअंतर्गत महाविद्यालय निहाय स्वतंत्रपणे वाढीव अभ्यासक्रमासाठी रुपये ५ लाख, वाढीव विषयासाठी रुपये २ लाख, वाढी विद्याशाखेसाठी रुपये ५ लाख व वाढीव तुकडीसाठी रुपये ३ लाखचे मुदत ठेव / एफ.डी. राष्ट्रीयकृत बँकेचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.
४) प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित महाविद्यालयांकडे अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया यांसाठी शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मुलभुत व भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.
५) तसेच नविन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया यांसाठी प्रस्ताव सादर करतांना शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मुलभुत व भौतिक सुविधा उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
६) तसेच संबंधित महाविद्यालयांनी नियमित मान्यताप्राप्त प्राचार्यांची नियुक्ती, नियमित मान्यताप्राप्त अध्यापक यांची नियुक्ती केलेली असणे आवश्यक आहे.
७) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम (४) (क) व शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२० अन्वये विहित केल्यानुसार व शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करणा-या महाविद्यालयांनीच सॅटेलाईट केंद्रासाठी परिशिष्ठ 'अ' व 'ब' नुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

८) विद्यापीठ अध्यादेश-१५१, १५२ व १५२ A अन्वये विहित केल्यानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांनी विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. सदरील शुल्क परत मिळणार नाही किंवा सदरील शुल्क ना परतावा असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

९) प्रस्तुत प्रकरणी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक सर्व संबंधितांना लागु राहतील.

करिता प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, १३ सप्टेंबर, २०१७ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरु करण्याकरीता उपरोक्त तरतुदींची परिपुर्तता करणा-या पात्र महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव व विहित शुल्क भरून त्याची हार्डकॉपी सर्व पुरक कागदपत्रांसह ०३ प्रतिंमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत शैक्षणिक विभागात सादर करावेत.

**संदर्भ क्र.** शैक्ष/संलग्न/२०२३-२४/15964-71 ==*==
**दिनांक** २६-१०-२०२३. ==*==
==*==

**कुलसचिव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१) मा.कुलगुरू महोदयांचे स्वीय सहायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
२) मा.प्र कुलगुरू महोदयांचे स्वीय सहायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३) अध्यक्ष / सचिव / प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रषित.
४) संचालक, युनिक विभाग यांना देउन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन अर्ज व शुल्क सादर करण्यासाठी ऑनलाईन लिंक इ. उपलब्ध करून द्यावी व वेळोवेळी प्राप्त प्रस्ताव व शुल्काचा तपशिल शैक्षणिक विभागास सादर करावा.
५) वित्त व लेखाधिकारी यांना देउन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन शुल्क सादर करण्यासाठी बँक व युनिक यांचे समन्वयाने API व्दारे सदरील शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.
६) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
७) जनसंपर्क अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

स्वा-
**कुलसचिव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.